सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २३६ | मंगळवार, दि. १९ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

१९ मे

- भारतीय वंशाचे नागरिक महेंद्र चौधरी यांची फिजीचे पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- रिझर्व्ह बँकने २ हजार रुपयांची नोट चलनातून काढून घेतली.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# जळगावची माती आणि शंभुराजेंचा पराक्रम

## एक जाज्वल्य ऐतिहासिक वारसा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्रा येथून सुटका करुन घेतल्यानंतर ते बऱ्हाणपूरमार्गे रायगडावर पोहचले होते. या प्रवासाचा मार्ग खान्देशच्या सीमेवरुन होता, हे आपणा सर्वांना माहित आहेच. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांसह छत्रपती संभाजी महाराज यांचा देखील पदस्पर्श जळगावजेव्हा आपण छत्रपती संभाजी महाराजांच्या देदीप्यमान कारकीर्दीचा विचार करतो, तेव्हा अनेकांच्या डोळ्यासमोर रायगड किंवा सह्याद्रीचे कडे येतात. पण खूप कमी लोकांना हे माहीत आहे की, जळगाव जिल्ह्याने स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींचा तो धगधगता पराक्रम जवळून अनुभवला आहे.**

जिल्ह्याला झाला आहे. मोगलांना मदत करणाऱ्या इंग्रजांना धडा शिकविण्यासाठी संभाजी महाराजांनी धरणगाव येथील इंग्रजांच्या वखारीवर भीषण हल्ला करुन इंग्रज सैन्याची दाणदाण उडवली होती. त्यापाठोपाठ पारोळा तालुक्यातील बहादरपूर येथील पेठेवर स्वारी करून मोगलांची आर्थिक कंबर तोडली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्य संपवण्याचे स्वप्न उराशी बाळगून औरंगजेब अफाट सैन्य घेऊन दक्षिणेत उतरला होता. त्याला उत्तर देण्यासाठी संभाजी महाराजांनी शत्रूच्या प्रदेशात घुसून त्याला आर्थिक तडाखा देण्याचे ठरवले. याच रणनीतीचा एक भाग म्हणून महाराजांनी आपली नजर वळवली ती म्हणजे 'खान्देश'वर. खान्देश हा त्याकाळी मोगलांच्या रसद पुरवठ्याचा मुख्य मार्ग होता.

### स्थानिक भौगोलिक लाभ आणि रणनीती

जळगाव जिल्ह्यातील तापी नदीचे खोरे, सातपुड्याच्या रांगा आणि इथल्या खिंडींचा वापर शंभूराजांनी गनिमी काव्यासाठी अत्यंत खुबीने केला. मोगलांना वाटले होते की मराठे केवळ किल्ल्यांवर लढतील, पण संभाजी महाराजांनी खानदेशच्या मैदानी प्रदेशात आपल्या घोडदळाच्या साह्याने मोगलांना पाणी पाजले. यामुळे औरंगजेबाला आपली रणनीती बदलावी लागली आणि त्याचा बराचसा वेळ आणि सैन्य या प्रदेशातील बंड शमवण्यातच खर्च झाला. आज आपण जेव्हा जळगाव, धरणगाव किंवा पारोळ्यावरून जातो, तेव्हा इथल्या वास्तूंमध्ये आणि मातीमध्ये तो पराक्रम दडलेला आहे. इंग्रजांच्या दप्तरातील ऐतिहासिक नोंदी आजही या घटनेची साक्ष देतात. जळगावचा हा ऐतिहासिक वारसा केवळ पुस्तकात बंद न राहता, तो प्रत्येक घराघरात पोहोचणे ही काळाची गरज आहे.

### बहादरपूरची पेठ आणि मोगलांची नाचक्की

पारोळा तालुक्यातील बहादरपूर हे त्याकाळी प्रचंड श्रीमंत ठिकाण मानले जाई. मोगलांच्या अनेक सरदारांची आणि व्यापाऱ्यांची मालमत्ता इथे एकवटलेली होती. संभाजी महाराजांनी या पेठेवर स्वारी करून मोगलांची आर्थिक कंबरच तोडली. बुऱ्हाणपूरच्या मुख्य मोहिमेआधी बहादरपूर आणि आसपासच्या परिसरात मराठ्यांनी जो दरारा निर्माण केला, त्यामुळे मोगल सैन्य सैरावैरा पळू लागले होते.

### धरणगावच्या वखारीवर हल्ला आणि इंग्रजांची दाणादाण

त्याकाळी धरणगाव हे कापूस आणि कापड व्यापाराचे मोठे केंद्र होते आणि तिथे इंग्रजांची एक महत्त्वाची वखार होती. इंग्रज छुप्या रीतीने मोगलांना मदत करत होते. हे लक्षात



येताच संभाजी महाराजांच्या सैन्याने धरणगावावर जोरदार हल्लाबोल केला. इंग्रज अधिकारी सॅम्युअल एस्टन्स याने लिहून ठेवलेल्या पत्रांनुसार, मराठा सैन्याचा वेग इतका प्रचंड होता की इंग्रजांना सावरून प्रतिकार करण्याची संधीच मिळाली नाही. या धडक्याने केवळ मोगलच नव्हे, तर पाश्चात्य सत्ताही हादरून गेल्या होत्या.

# गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचे रजिष्टार प्रवीण कोल्हे सर यांचे अपघाती निधन

## प्रवीण सरांची प्रेरणा मिळावी, यासाठी पुतळा उभारू : डॉ. पाटील



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : जळगाव येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचे रजिष्टार प्रवीण प्रल्हाद कोल्हे (वय ४८, रा. रोझोदा, ता. रावेर, जि. जळगाव, ह. मु. जळगाव) यांचे शुक्रवार, दि. १५ मे रोजी अपघाती निधन झाले. गुरुवार, दि. १४ मे रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास चुलतभावाच्या लग्नसोहळ्यास उपस्थिती देऊन भुसावळहून रोझोदा येथे जाताना त्यांची कार (एमएच १९-सीव्ही ०६२४) पिंपरूड (जि. जळगाव) फाट्याजवळ झाडावर धडकली. या अपघातात त्यांच्यासह त्यांची आई उषा (वय ६९), पत्नी हर्षा (वय ३८), मुलगी निर्मिती (वय १०) आणि वहिनी भावना निलेश कोल्हे (वय ४१) हे जखमी झाले होते. त्यानंतर या सर्वांवर जळगावातील डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना प्रवीण कोल्हे यांचा मृत्यू झाला. अंत्यसंस्काराप्रसंगी गोदावरी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील कमालाचे भावुक झाले. ते म्हणाले, की दिवंगत प्रवीण कोल्हे सरांच्या अंगी बाणवलेल्या शिस्तीची, कामसूपणाची,

पान २ वर

### अंत्यसंस्काराप्रसंगी डॉ. उल्हास पाटील भावुक



प्रवीण सर यांच्या अंत्यसंस्काराप्रसंगी गोदावरी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील कमालाचे भावुक झाले. ते म्हणाले, की आज गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत उभी राहत आहे. तिची पायाभरणी प्रवीण करून गेला. स्वतःचा आयुष्यातील प्रवास सुरू असताना आई-बाबा हे सुद्धा प्रवीणजवळच राहत होते. वडिलांच्या निधनाअगोदरपासूनच प्रवीणने महाविद्यालयाप्रमाणे घराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. वडीलकीच्या नात्याने तोच कुटुंबातील सर्व निर्णय घेत असे. त्याच्यातील शिस्त, निर्णयक्षमता यामुळे कुटुंबात त्याच्या निर्णयानुसार, सल्ल्यानुसार सर्व काही अंमलबजावणी होत असे. असा आमचा लाडका प्रवीण गोदावरी नर्सिंग महाविद्यालय वटवृक्षाप्रमाणे उभे करून मित्र, आप्तेष्ट यांच्या मनाला वेदना देऊन अचानक आमच्यातून कायमचा निघून गेला. त्याची उणीव गोदावरी परिवार, मित्र परिवार यांना कायम भासत राहील. आजच्या या अंत्यसंस्काराप्रसंगी मी जाहीर करतो, की दिवंगत प्रवीण कोल्हे सरांच्या अंगी बाणवलेल्या शिस्तीची, कामसूपणाची, महाविद्यालय प्रगतीपथावर नेण्याची सतत आपणा सर्वांसह येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी आठवण राहावी. तसेच प्रवीण यास अपेक्षित अशी महाविद्यालयाची प्रगती सतत होत राहो, यासाठी प्रवीणचा पुतळा गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारला जाईल. यातून आपणास सतत प्रेरणा मिळेल.

# मंत्री गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवशी अमळनेरात विविध सामाजिक उपक्रम



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : राज्याचे जलसंपदामंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त अमळनेरसह तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा नेत्या सौ. भैरवीताई वाघ-पलांडे यांच्या नेतृत्वात भाजप व भाजयुमोच्या पदाधिकाऱ्यांनी समाजोपयोगी उपक्रम राबवत वाढदिवस उत्साहात साजरा केला.

मंगळग्रह सेवा संस्था व तीर्थक्षेत्र विकास आघाडी भाजप जिल्हा यांच्या वतीने अमळनेर-चोपडा नाका येथे पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. उन्हाच्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना शुद्ध व थंड पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला. तसेच मंगळग्रह मंदिर परिसरात मोतीबिंदू तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दरम्यान, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा अमळनेरतर्फे बसस्थानक परिसरात प्रवाशांना नारळ पाणी वाटप करण्यात आले. वाढत्या तापमानामुळे प्रवाशांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच नर्मदा फाऊंडेशन येथे रुग्णांना फळ वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

सदर उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी भाजप शहराध्यक्ष योगेश महाजन, नर्मदा फाऊंडेशनचे डॉ. अनिल शिंदे, भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश बाविस्कर तसेच भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी राजपूत यांचे अनमोल सहकार्य लाभल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. या उपक्रमांप्रसंगी भाजप शहराध्यक्ष योगेश महाजन, जानवे मंडल अध्यक्ष जिजाबनाना पाटील, जिल्हा उपाध्यक्ष लालचंद सैनानी, माजी जि. प. सदस्य व्ही. आर. आप्पा पाटील, माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी, डॉ. अनिल शिंदे, माजी तालुकाध्यक्ष हिरालाल पाटील, हरचंद लांडगे, सौ. भारतीताई सोनवणे, भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश बाविस्कर, सरचिटणीस भरतसिंग परदेशी, देवाभाऊ लांडगे, मछिंद्र लांडगे, दीपक भोई, दिलीप ठाकूर, सुभाष पाटील, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी राजपूत, कल्पेश पाटील, युवा मोर्चा शहराध्यक्ष राहुल चौधरी, पातोंडा मंडल निखिल धनगर, जानवे मंडल हिरालाल पाटील, शिवकिरण बोरसे, सुमित राजपूत, यश शहा, शंतनू भावसार, राजेश खरारे, निखिल पाटील, अमोल पाटील, जाकीर मेवाती, उदय साळुंखे, मिलिंद पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




*अमळनेर : राज्याचे जलसंपदामंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त अमळनेरसह तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा अमळनेरतर्फे बसस्थानक परिसरात प्रवाशांना नारळ पाणी वाटपप्रसंगी उपस्थित मान्यवर.*

# जळगाव जिल्ह्यात २९ मे पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : सध्या आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इराण-इस्त्राईल युद्ध सदृश परिस्थितीमळे तसेच आगामी सण-उत्सव, थोर व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथींच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यात मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अंतर्गत जळगाव जिल्ह्यात २९ मे २०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी या कालावधीत जिल्ह्यात शस्त्रे, दाहक किंवा स्फोटक पदार्थ बाळगणे, दगड किंवा तत्सम वस्तू जमा करणे, सार्वजनिक ठिकाणी उत्तेजक घोषणा देणे, आक्षेपार्ह हावभाव करणे तसेच व्यक्तींच्या प्रतिमांचे दहन करणे यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच, पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करण्यासाठी पोलीस अधीक्षकांची पूर्वपरवानगी आवश्यक राहणार असून, विनापरवानगी सभा किंवा

मिरवणुका काढण्यास मनाई करण्यात आली आहे.दरम्यान हा आदेश शासकीय कार्यक्रम, धार्मिक मिरवणुका, लग्न समारंभ व प्रेतयात्रा यांना लागू नसून, तसेच कर्तव्य बजावताना शस्त्र बाळगणे आवश्यक असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनाही यातून सूट देण्यात आली आहे. हे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी जारी केले आहे. यासाठी अमळनेर पोलीस विभाग तसेच प्रशासकीय स्तरावर गस्त वाढविण्यात आलेली आहे.

# मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिराचा ७४ जणांनी घेतला लाभ

## मंगळग्रह सेवा संस्थेचा उपक्रम : शस्त्रक्रियेसाठी ३९ रुग्ण रवाना

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था, मा. ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाऊंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाऊंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्यातर्फे रविवार, दि. १७ एप्रिल रोजी श्री मंगळग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराचा ७४ रुग्णांनी लाभ घेतला. पैकी ३९ रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले. रविवारी , दि.१७ एप्रिल रोजी श्री मंगळग्रह मंदिर येथून विशेष वाहनाने आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) येथे शस्त्रक्रियेसाठी त्यांना रवाना करण्यात आले.

या शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांनी सहभाग नोंदविला. डॉ. राहुल चौधरी, डॉ गुरुपितसिंग राठोड, डॉ.विजय बामणे, अनिल मुंडे, अमरीश लोंढे,अवंतिका गलांडे व प्राजक्ता गायकवाड यांनी रुग्णांची तपासणी केली.

मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम यांनी मार्गदर्शनात शिबिराची माहिती दिली. यावेळी उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, अनिल कदम, प्रमोद पाटील, नितेश बारी, मयूर चौधरी आदींनी सहकार्य केले. दरम्यान, सदर शिबिर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी श्री मंगळग्रह मंदिर येथे नियमितपणे होते, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे आवाहन करण्यात आले आहे.





*अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे आयोजित मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिरांतर्गत रविवारी तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात शिबीरासाठी उपस्थित नागरिक.*
*(छायाचित्रे : मयूर चौधरी)*

## संपादकीय

### काटकसरीचे भान सर्वांनाच असावे

सरकार जेव्हा आर्थिक संकटातून जात असते तेव्हा जनतेला काटकसरीचे आवाहन केले जाते. रुपयाची आंतराष्ट्रीय बाजारात काय किंमत आहे हे सर्वांना ठाऊक आहे आणि बाहेर व्यवहार अमेरिकन डॉलर्समधून होत असल्याने भारताला ते जड जातेय. गेले दोन महिने होर्मुझची सामुद्रधुनी बंद आहे. कितीही नाही म्हटले तरी याचा परिणाम तेल व नैसर्गिक वायू पुरवठा यावर झालाच आहे. शिवाय भारतीय वस्तूंच्या निर्यातीवरही झाला आहे.एकूण काय तर परकीय चलनाद्वारे कमीत कमी खरेदी व्हावी व देशाच्या गरजा मर्यादित ठेवाव्या हा त्याचा अर्थ. बचत करा म्हणजेच टंचाईला तोंड द्या. शासकीय भाषेत दुष्काळाला टंचाई हा शब्द आहे. पाण्याची टंचाई, अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली की हा शब्द वापरला जातो. वेगळ्या मार्गाने जनतेला सामील करून घेत सर्व गोष्टींचे रेशनींग सुरू होणे याचाच दुसरा अर्थ टंचाई परिस्थितीला सामोरे जाणे असा होतो. काटकसरीचे आवाहन फक्त सामान्य जनता व शेतकरी वर्गालाच का, असा एक सवाल प्रामुख्याने केला जात आहे. आज शेतकरी अडचणीत आहे व तो वेगवेगळ्या समस्यांचा सामना करत आहे. उत्पादन खर्चही निघत नाही तेव्हा नफ्याचे गणित जुळता जुळत नाही. शेतीला उत्तम जोडधंदा म्हणून ओळखला जाणारा दुधाचा व्यवसाय अडचणीत आहे. शेतकरीवर्गाच्या मते दुधाचा उत्पादनखर्च लिटरमागे ५० रुपये असताना बाजारात ३६ ते ४१ रुपये दर मिळतो. परवा एका कांदा उत्पादक शेतकऱ्याला अवघ्या एक रुपया किलो दराने कांदे विकावे लागल्याचे वृत्त आले.शेतकरीवर्गाने रासायनिक खतांचा वापर कमी करावा अशी अपेक्षा पंतप्रधान व्यक्त करतात. पण सेंद्रीय खत वापर, सौरऊर्जा निर्मिती याला फारसे पोषक वातावरण व प्रोत्साहन दिसत नाही.सेंद्रीय खतांसाठी फारसे काही करताना दिसत रासायनिक खतांसाठी अनुदान देणारे केंद्र सरकार नाही. सेंद्रीय उत्पादने वाढवणे ही काळाची गरज असतानाही त्यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती नाही. देशी तेलबिया उत्पादन वाढावे व त्याला उत्तम भाव मिळावा अशी अपेक्षा असताना विदेशातून तेल आयातीवर नियंत्रण न आणता आता परकीय चलन वाचवण्यासाठी याचा वापरच कमी करा असे आवाहन केल्याने लोक बुचकळ्यात पडले आहेत हे वास्तव आहे.

देशापुढे अडचणी येतात तेव्हा पोटाला चिमटा घेऊन कनिष्ट मध्यमवर्ग व शेतकरीच ढाल बनतो. त्याच्या तक्रारी व गाऱ्हाण्यांना आवाज नसतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर कमी होते तेव्हा सर्वसामान्यांना दिलासा मिळाला नव्हता. कार्पोरेट टॅक्समध्ये कपात केली गेली तेव्हा वेगळीच भाषा होती. देशापुढे अडचणी आल्या की मध्यमवर्ग, शेतकरी, बेरोजगार, गृहिणी यांनाच त्याची तोशीस सहन करावी लागते. जेव्हा बँकांची काही लाख कोटींची थकित कर्जे निर्लेखित केली जातात, कार्पोरेट टॅक्समध्ये कपात केली जाते तेव्हा हाच वर्ग आपण यात कुठे आहोत का, हे शोधत असल्याची भाषा विविध प्रतिक्रियांमधून ऐकायला मिळत आहे.बचतीचे मार्ग म्हणून सार्वजनिक वाहतुकीचा वापर, मोठे लग्न समारंभ, परदेश दौरे याबाबत सल्ले दिले जात आहेत. समजा सर्व उपाययोजना केल्या तरी देशाची उत्पादकता वाढून ट्रिलीयन डॉलर, पाच ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेची स्वप्ने ठरलेल्या मुदतीत साकार होणार आहेत ? या आदेशात केवळ यजमान नव्हे तर जेवण बनवणारे केटरर्स, जिथे जेवणावळी आयोजित केल्या जातात अशी हॉटेल्स यांच्यावरही बंधन आणले गेले होते. त्यावेळी तांदळाची टंचाई असल्याने याचे एकापेक्षा अधिक पदार्थ बनविण्यावरही बंधन आणले गेले होते. जिथे प्रसाद म्हणून पदार्थ तयार केले जातात त्यांना एका व्यक्तीसाठी ४० ग्रॅमपेक्षा अधिक वजन असलेले जिन्नस बनवता येत नव्हते. या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याचे सर्वाधिकार शिधावाटप नियंत्रक व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. आज देशात भलेही अन्नधान्याची टंचाई नसेल, पण परकीय चलन वाचविण्यासाठी कठोर उपाययोजना करताना त्या केवळ विशिष्ट वर्गासाठी असता कामा नयेत. पेट्रोल, डिझेलचा वापर मर्यादित असावा यासाठी पंतप्रधानांनी स्वतःच्या वाहन ताफ्यात कपात केली असे वृत्त आले आहे. राज्यातही त्याची कसोशीन अंमलबजावणी व्हायला हवी. मागे पंतप्रधानांनी लाल दिवा संस्कृती बंद केली तेव्हा त्याची राज्यातही अंमलबजावणी सुरू झाली. पण समोर आणि मागे पोलिसांची लाल–पिवळा दिवा असलेली वाहने ठेवली जातात. ते दिवेही सुरू असतात आणि त्या गाड्यांचे सायरनही सुरू असतात. त्याचा अर्थ सामान्यांना कळत नाही असे समजण्याचे कारण नाही.सरकारी व्यवस्थेत मोठ्या पदांवरील लोकांकडे एकापेक्षा अनेक गाड्या तैनात ठेवल्या जातात. त्यातील काही तर ऐनवेळी पै–पाहुणे, कटुंबातील इतर सदस्यांना लागतात म्हणून असतात. एखाद्या विभागाच्या अतंर्गत एकापेक्षा अधिक शासकीय उपक्रम असतील तर प्रत्येक उपक्रमाचे एक वाहन वरिष्ठांच्या दिमतीसाठी तयार ठेवले जाते. अशी सर्व वाहने काढून घेऊन लोकांपुढे आदर्श ठेवता आला पाहिजे.हल्ली मंत्री व विधिमंडळ सदस्यांना फक्त सुरक्षा रक्षकच नाही तर मागे–पुढे वाहनेही लागतात. एखाद्याला खरेच याची गरज आहे का हे न पाहताही सत्ताधारी बाजूच्या बहुतेक सर्वांना 'वाय' दर्जाची सुरक्षाव्यवस्था पुरविण्यात येत आहे. त्यासाठी एकापेक्षा अधिक वाहने लागतात. याचाही फेरविचार पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनानुसार झाला पाहिजे.

# उष्णतेचा कहर : अमळनेर तालुक्यात चार ठिकाणी आग

## अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला






ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यात वाढत्या उष्णतेचा फटका आता आग लागण्याच्या घटनांमधून दिसून येत असून, रविवारी दि. १७ रोजी एका दिवसात चार वेगवेगळ्या ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या. मात्र, अमळनेर अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत वेळेत आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत अधिक माहिती अशी की, पहिली घटना दुपारी १२.४५ वाजेच्या सुमारास मंगरूळ येथे घडली. गावालगत असलेल्या खळवाडीस अचानक आग लागली. त्यानंतर दुपारी १.५५ वाजता मारवड रोडवरील एका शेतात आग लागल्याची माहिती अग्निशमन विभागाला मिळाली. त्याचवेळी दुपारी २.०५ वाजता गलवाडे रोडवरील गंगा एक्का परिसरातील झाडांना आग लागली. काही मिनिटांतच दुपारी २.१५ वाजता नंदगाव रोडलगतच्या शेतांमध्येही आग लागल्याची घटना समोर आली. घटनांची माहिती मिळताच नगरसेवक मुक्तार खाटीक, पंकज चौधरी आणि भुरा चौगुले यांनी अग्निशमन विभागाशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून तातडीने मदत मागविली. त्यानंतर अग्निशमन दलाने चारही ठिकाणी वेगाने पोहोचून आग विझविण्याचे काम हाती घेतले. अग्निशमनाधिकारी गणेश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, फारुख शेख, जफर पठाण, मच्छिंद्र चौधरी, भिका संदानशिव, मुन्ना धनगर आणि आकाश बाविस्कर यांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. विशेषतः नंदगाव रोडवरील तांबेपुरा परिसरात आग विझविताना माजी नगरसेवक मुक्तार खाटीक, बाबा खाटीक यांच्यासह शेतकरी नाना हिलाल पाटील, शेषराव रामराव पाटील आणि चेतन विजय पाटील यांनीही मदतकार्यामध्ये सहभाग घेतला. उन्हाचा तीव्र वाढता पारा, कोरडे गवत आणि वाऱ्याचा वेग यामुळे आगीच्या घटना वाढत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिकांनी शेत परिसरात तसेच उघड्या जागांमध्ये अधिक सतर्कता बाळगावी, असे आवाहन अग्निशमन विभागाकडून करण्यात आले आहे.

# गांधलीला 'सर्वोत्कृष्ट गृह संकुल' पुरस्कार

## १०० घरकुलांची कॉलनी उभारल्याने राज्यात तिसरा क्रमांक



***अमळनेर : सर्वोत्कृष्ट गृह संकुल पुरस्कार स्वीकारताना एन. आर. पाटील, नरेंद्र पाटील, प्रमोद पाटील, गुणवंत सोनवणे आदी.***

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील ग्रामपंचायत गांधली यांनी शासनाच्या महा आवास अभियान अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सन २०२३–२४ मध्ये राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत "सर्वोत्कृष्ट गृह संकुल" या कॅटेगिरीमध्ये तृतीय क्रमांकाचा मानाचा पुरस्कार प्राप्त केला आहे. हा पुरस्कार सातारा येथे आयोजित भव्य राज्यस्तरीय कार्यक्रमात केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शंभूराज देसाई, उदयनराजे भोसले व नामदार शिवेंद्रराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

सदर पुरस्कार स्वीकारण्यासाठी अमळनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एन. आर. पाटील,ग्रामपंचायत गांधलीचे प्रथम नागरिक आदर्श सरपंच नरेंद्र पाटील, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद पाटील, गुणवंत सोनवणे व नितीन पाटील उपस्थित होते.

ग्रामपंचायत गांधलीच्या या यशाबद्दल सरपंच नरेंद्र पाटील, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच संपूर्ण गावकऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. घरकुल योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सोमवंशी तसेच प्रकल्प संचालक लोखंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांनी सर्वांचे अभिनंदन केले. तसेच गृह संकुल उभारणीच्या कामात ग्रामपंचायत गांधली येथील लाभार्थी, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, घरकुल कक्षातील अभियंते व ऑपरेटर यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच ग्रामपंचायत गांधलीला राज्यस्तरावरील हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# ग्रामीण भागातील तरुणाची उत्तुंग भरारी

## सोहम शेंडे पहिल्याच प्रयत्नात बनले आयएफएस अधिकारी!



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांचा मुलगा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रथमवर्ग अधिकारी झाला. भाडळी बुद्रुक (ता. फलटण) येथील निवृत्त वरिष्ठ मुख्याध्यापक नामदेव शेंडे यांचा मुलगा सोहम यांची नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या यूपीएससी परीक्षेच्या निकालामध्ये देशामध्ये (आयएफएस रँक –७५) मिळवून वनविभागात प्रथमवर्ग अधिकारी म्हणून निवड झाली आहे.सोहम यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद केंद्र शाळा (राजुरी), माध्यमिक शिक्षण मुधोजी हायस्कूल व ज्युनियर कॉलेज (फलटण) येथे, तर पदवीचे शिक्षण वालचंद कॉलेज (सांगली) येथून झाले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून ते दिल्लीत यूपीएससीच्या परीक्षेची तयारी करत होते. विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नामध्ये त्यांनी हे यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील तरुणांना एक नवा आदर्श घालून दिला आहे. या यशाबद्दल त्यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

# खरिपाच्या उंबरठ्यावर एटीएममध्ये खडखडाट

## किसान काँग्रेसचे निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; अग्रणी बँक व्यवस्थापकांना आदेश



***अमळनेर : निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांना निवेदन देताना किसान काँग्रेसचे प्रा. सुभाष पाटील व अन्य कार्यकर्ते.***

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : खरीप हंगाम अगदी तोंडावर आला असताना आणि शेतीची कामे सुरू असताना जळगाव जिल्ह्यातील बहुतांश एटीएममध्ये पैशांचा खडखडाट असल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. हातात पीककर्जाचे पैसे नसल्याने खते व बियाणे खरेदी रखडली आहे. या गंभीर प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जळगाव जिल्हा किसान काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी (दि. १५ जून) निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांना निवेदन देण्यात आले.


मार्चअखेर पोटाला चिमटा काढून कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २० एप्रिलनंतर कृषी एटीएम कार्डमार्फत पीककर्जाचे वाटप सुरू करण्यात आले आहे. मात्र, गेल्या महिनाभरापासून शेतकरी पैसे काढण्यासाठी एटीएमच्या रोज चकरा मारत आहेत. बहुतांश एटीएममध्ये पैसे उपलब्ध नसतात, तर काही ठिकाणी कृषी कार्ड चालत नाही. खते, बियाणे खरेदी आणि उसनवारी फेडण्यासाठी पैशांची अत्यंत गरज असताना हाती रोकड पडत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. ज्या अशिक्षित शेतकऱ्यांना एटीएम हाताळता येत नाही, त्यांना सोबत भाड्याने माणूस आणावा लागत असल्याने नाहक आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची तत्काळ दखल या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी जिल्ह्याची अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँकेचे व्यवस्थापक सुनील दोहरे यांना तत्काळ फोन करून या प्रश्नावर तातडीने मार्ग काढण्याचे आदेश दिले.

प्रशासकीय भेटीनंतर किसान काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी अग्रणी बँक (सेंट्रल बँक) व्यवस्थापकांचीही भेट घेतली आणि त्यांना लेखी निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांची प्रत्यक्ष माहिती दिली. यापूर्वीही या प्रश्नावर फोनवरून चर्चा करण्यात आली होती. बँक प्रशासनाने शिष्टमंडळाला सांगितले की, "आम्ही या संदर्भात रिझर्व्ह बँकेच्या संपर्कात असून, पुरेशा रोख रकमेची मागणी नोंदवली आहे. लवकरच यावर मार्ग काढला जाईल, असे आश्वासन दिले.जिल्हा बँकेमार्फत किमान निम्मे कर्ज तरी रोखीने देण्यात यावे, अशी मागणी यापूर्वीच करण्यात आली आहे. हे निवेदन जळगाव जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष सुकलाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी दिनेश पवार (तालुका अध्यक्ष) यांच्यासह अन्य पदाधिकारी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# बाळासाहेब पवार यांचे निधन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



**अमळनेर : येथील नामवंत फोटोग्राफर बाळासाहेब उर्फ प्रभाकर वामनराव पवार (८६) यांचे वृद्धापकाळाने दि.१४ च्या रात्री निधन झाले.**त्यांचे दोघे भाऊदेखील प्रसिद्ध फोटोग्राफर होते. या क्षेत्रातील येथील 'गुलाबराव सदन'च्या पवार परिवारातील ही तिसरी पिढी कार्यरत आहे. बाळासाहेबांचा क्लासिक नावाचा फोटो स्टुडिओ आहे.बाळासाहेबांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. ते रॉकी पवार व मंगेश पवार यांचे वडील होत. बाळासाहेब हे ब्लॅक अँड व्हाईट च्या जमान्यात विविध दैनिकांचे काही काळ छायाचित्रकार देखील होते. त्यांनी टिपलेल्या स्थानिक घडामोडींसह विविध विषयांवर छायाचित्र काढून वेगळा ठसा उमटविला होता. त्यांचा दशक्रिया विधी दि.२३ मे ला तर गंधमुक्ती व उत्तरकार्य दि.२५ मे रोजी सकाळी १० वाजता ब्राह्मणवाडी,भगिनी मंडळ शाळेच्या बाजूला,अमळनेर येथे होणार आहे.

# रात्री ३ नंतर उडते झोप?

## शरीर काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करतेय

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

ना गजर. ना आवाज. फक्त पहाटेपूर्वी अचानक जाग येणे आणि मनात विचारांची गर्दी होती, तर तुमचे शरीर काहीतरी तातडीचा संदेश देण्याचा प्रयत्न करत आहे रात्री ३:४७ वाजता डोळे उघडे ठेवून बेचैन होऊन जाग येणे हे जरी अचानक आणि अनियमित वाटत असले, तरी ते सहसा तसे नसते रात्री २ ते पहाटे ५ या वेळेत शरिरात हार्मोन्सची निर्मिती, शरीराचे तापमान आणि इतर अनेक शारीरिक प्रक्रियांवर नियंत्रण ठेवते. कॉर्टिसॉल जो आपल्याला सतर्क आणि जागृत ठेवणारा हार्मोन आहे, तो या वेळेत हळूहळू वाढू लागतो. त्यामुळे गजर वाजण्याच्या आधीच झोपेतून उठवते. मेंदू आरईएम झोपेलाच धोक्याचा संकेत समजतो. या अवस्थेत मेंदू आठवणी, भावना आणि दिवसातील न सुटलेले विचार प्रक्रिया करत असतो. पहाटेच्या वेळेत आरईएम झोप अधिक प्रमाणात असते. त्यामुळे याच टप्प्यात जाग येण्याची आणि ते लक्षात राहण्याची शक्यता जास्त असते. जर तुमचे शरीर वारंवार पहाटे ३ ते ५ दरम्यान जागवत असेल, तर तुमच्या क्रोनोटाइपकडे लक्ष देणे आवश्यक ठरू शकते. तुमचे शरीर केवळ झोपेबद्दलच नाही, तर तुमच्या जीवनशैली, तणावाची पातळी आणि दैनंदिन लयीबद्दलही इशारा देत आहे.

# गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचे रजिष्टार प्रवीण कोल्हे सर यांचे अपघाती निधन

**पान १ वरून**

महाविद्यालय प्रगतीपथावर नेण्याची सतत आपणा सर्वांसह येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी आठवण राहावी. तसेच प्रवीण यास अपेक्षित अशी महाविद्यालयाची प्रगती सतत होत राहो, यासाठी प्रवीणचा पुतळा गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारला जाईल.


**प्रवीण सरांचे अमळनेरच्या मातीशी घट्ट नाते**

दिवंगत प्रवीण कोल्हे सर यांचे वडील प्रल्हाद कोल्हे हे अमळनेर (जि. जळगाव) येथील प्रताप मिलमध्ये कामाला होते. ते तीन भावंड होते. मोठे भाऊ 'आयटीआयटी'चे शिक्षण घेऊन वापी येथे, लहान भाऊ एम.एस्सी.–केमिस्ट्रीचे शिक्षण प्रताप महाविद्यालयातून पूर्ण करून मुंबईत खासगी कंपनीत नोकरीस आहेत. अमळनेर येथील सुनील बोंडे सर की जे गोदावरी फाऊंडेशनमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी त्यांच्या परिचयातील अमळनेरचेच मॉडर्न कॉम्प्युटर्सचे संचालक नितीन कोल्हे यांना विचारणा केली, की कोणी गरजू, होतकरू कॉम्प्युटरवर व्यवस्थितपणे काम करू शकेल असा व्यक्ती असल्यास सांग. आमच्याकडे जागा रिक्त आहे. त्याच क्षणी बोंडे सर व नितीन कोल्हे यांना सुपरिचित असलेले मेहनती व कष्टाळू असलेले प्रवीण सर आठवले. प्रवीण यांचे नाव सुचविताच त्यांना गोदावरी परिवारात सामील होण्याबाबत सांगण्यात आले. सुरूवातीला प्रवीण सरांचे अमळनेरशी घट्ट नाते जुळले असल्याने त्यांनी अमळनेर येथूनच गोदावरी फाऊंडेशन, जळगाव येथे दररोज ये–जा केली. काहीवेळा याचा कंटाळा यायचा तर ते तसे बोलूनही दाखवत. मात्र, काही काळानंतर हळूहळू ते रुळले. नंतर त्यांच्या आयुष्यात पत्नी सौ. हर्षाचे आगमन झाले. त्यांना पुढे कन्यारत्न प्राप्त झाले. अशा वेळी ये–जा थांबवून गोदावरी हॉस्पिटल परिसरातील कर्मचारी निवासस्थानात त्यांनी धावपळ टाळून राहायला यावे, असा प्रस्ताव काळजीपोटी डॉ. उल्हास पाटील यांनी प्रवीण सरांना दिला. सुरूवातीला आपल्याला अमळनेर सोडावे लागेल, याचे वाईट वाटल्याने प्रवीण सरांनी जळगावात शिफ्ट होण्यास नकार दिला. मात्र, नंतर व्यवहार्य बाब म्हणून गोदावरी हॉस्पिटल परिसरात वास्तव्यास जाणे त्यांनी पसंत केले. त्याचवेळी गोदावरी नर्सिंग महाविद्यालयातील कामकाजाची अतिरिक्त जबाबदारीही प्रवीण सरांवर सोपविण्यात आली. त्यांनी ती लीलया पार पाडली. अशा या कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय आणि जिद्दी स्वभावाच्या प्रवीण सरांना दै. 'ग्लोबल महातेज' परिवारासह समस्त अमळनेरकरांकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# आंबा फ्रीजमध्ये ठेवावा की नाही?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आंब्याचा हंगाम
फळांचा राजा आंबा आणि आंब्याचा हंगाम सुरू झाला आहे
फ्रीजमध्ये आंबे
पण एक प्रश्न पडतो कापलेला किंवा न कापलेला आंबा फ्रीजमध्ये ठेवावा की नाही, जाणून घ्या.
पिकलेल्या आंब्याचे नियम
पूर्ण पिकलेले आंबे फ्रीजमध्ये ठेवल्यास पिकण्याची प्रक्रिया मंद होते आणि ते जास्त दिवस टिकतात.
कच्च्या आंब्याचे नियम
कच्चे आंबे फ्रीजमध्ये कधीही ठेवू नका, ते व्यवस्थित पिकत नाहीत.
फ्रीजमधील टिकाऊपणा
पिकलेले आंबे फ्रीजच्या खालच्या ड्रॉवरमध्ये ४-५ दिवसांपर्यंत ठेवता येतात
चव आणि पोत यावर परिणाम
अचानक फ्रीजमध्ये ठेवल्यास आंब्याची नैसर्गिक चव, गंध आणि पोत बिघडू शकते.
कापलेल्या आंब्याची काळजी
कापलेले आंब्याचे तुकडे हवाबंद डब्यात ठेवून फ्रीजमध्ये ठेवावेत, लिंबाचा रस शिंपडल्यास चांगले
खोलीच्या तापमानातील साठवण
कच्चे आंबे खोलीच्या तापमानावर कागदाच्या पिशवीत ठेवल्यास लवकर पिकतात.

# तानों को बनाया ताकत : जब यूपीएससी चुना तो दुनिया हंसी, पहले ही एटेम्पट में अफसर बनकर चौंकाया

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कहते हैं कि सफलता अक्सर उन लोगों के हिस्से आती है जो तानों का जवाब शब्दों से नहीं बल्कि अपनी कड़ी मेहनत और लगन से देते हैं। तेजस्वी सतपुते की कहानी भी कुछ ऐसी है। उन्होंने जब यूपीएससी को चुना तो मजाक बनना शुरू हो गया था। लोगों ने ताने दिए लेकिन उन्होंने उनकी बातों का जवाब सफलता पाकर दिया। एलएलबी की पढ़ाई के दौरान उन्होंने यूपीएससी का पहला अटेंप्ट दिया था और एग्जाम क्रैक किया। आज वह पुणे में आयपीएस अफसर हैं। इस सक्सेस स्टोरी में उनके संघर्षभरे यूपीएससी के सफर को देखते हैं जिसे उन्होंने बयां किया है।तेजस्वी एक इंटरव्यू में बताती हैं कि वह

**सक्सेस स्टोरी**

महाराष्ट्र के अहमदनगर के सेवगांव की रहने वाली हैं। वह एक साधारण परिवार से आती हैं। उनकी मां प्राइमरी टीचर रहीं और उनके पिता खेती करते थे और अभी वह भी व्यापारी हैं। जब वह छोटी थीं तो पायलट बनना चाहती थीं लेकिन आगे चलकर कुछ परेशानियों की वजह से वह उसमें आगे नहीं बढ़ पाईं।१०वीं-१२वीं की पढ़ाई के बाद सबसे पहले उन्होंने बॉयोटेक्नोलॉजी के बारे में सुना था। इसके बाद उन्होंने



अलग राह पकड़ी। वकालत की पढ़ाई के लिए एलएलबी की तैयारी शुरू कर दी थी। इस दौरान उन्हें यूपीएससी के बारे में पता चला था और उन्होंने अपने दोस्तों से भी इसके बारे में पूछा। दोस्तों ने परीक्षाओं की तैयारी को लेकर बताया था।इसके बाद उन्होंने यूपीएससी की तैयारी शुरू कर दी थी। हालांकि, वह ३ बार अपनी फील्ड बदल चुकी थीं। पहले बॉयोटेक्नोलॉजी, फिर एलएलबी के साथ ही यूपीएससी चुनने की वजह से उन्हें मजाक और तानों का सामना करना पड़ा। यूपीएससी की तैयारी के बारे में जब वह बताती तो उन्हें लोग मजाक उड़ाते थे कि ये क्या चल रहा है, कोई एक फील्ड में नहीं जा पा रही हो।एलएलबी के दौरान उन्होंने यूपीएससी का पहला अटेंप्ट दिया था। हालांकि, इसमें उन्हें असफलता मिली थी। पहली बार उन्होंने कोई एग्जाम दिया और फेल हो गई थीं। इस दौरान उनके माता-पिता से भी लोग सवाल पूछने लगे थे। इस दौरान तेजस्वी ने पुणे छोड़कर मुंबई जाने का फैसला किया और वहां तैयारी शुरू कर दी। इस बार उन्होंने पूरी तरह से पढ़ाई पर फोकस किया।१ साल तक उन्होंने सिर्फ यूपीएससी के बारे में सोचा था और यही वजह थी कि २०१२ में वह यूपीएससी में १९८ रैंक हासिल कर IPS अधिकारी बनी थीं। इतिहास और मराठी लिटरेचर उनके ऑप्शनल सब्जेक्ट थे। तेजस्वी महाराष्ट्र कैडर की २०१२ बैच की आयपीएस अधिकारी हैं। अभी वह पुणे में अफसर हैं। हाल ही में तेजस्वी सातपुते को पुणे क्राइम ब्रांच का अतिरिक्त पुलिस आयुक्त नियुक्त किया गया है।




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सध्या राज्यात प्रचंड उष्णता असून अनेक ठिकाणी तापमान 40 ते 45 अंशांपर्यंत पोहोचत आहे. अशा वेळी उष्माघात होण्याचा धोका वाढतो.उष्माघात वेळेत ओळखला नाही तर तो गंभीर ठरू शकतो. त्यामुळे त्याची लक्षणे आणि तातडीचे प्रथमोपचार प्रत्येकाने जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे.**

### उष्माघाताची प्रमुख लक्षणे

- शरीराचे तापमान खूप वाढणे (४० सेल्सिअस किंवा अधिक)
- तीव्र डोकेदुखी
- चक्कर येणे
- अशक्तपणा आणि थकवा
- मळमळ किंवा उलटी
- त्वचा गरम व कोरडी होणे
- जास्त घाम येणे किंवा घाम अचानक बंद होणे
- हृदयाचे ठोके वेगाने धडधडणे
- गोंधळ, अस्वस्थता किंवा बेशुद्ध पडणे
- स्नायूंमध्ये गोळे येणे




### उष्माघात झाल्यास त्वरित प्रथमोपचार

- व्यक्तीला ताबडतोब सावलीत किंवा थंड जागी आणा.
- घट्ट कपडे सैल करा.
- कपाळ, मान, बगल आणि हात-पायांवर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवा.
- पंखा किंवा कूलरचा वापर करून शरीर थंड करा.
- व्यक्ती शुद्धीत असल्यास थोडे-थोडे पाणी, लिंबूपाणी किंवा ORS द्या.
- बेशुद्ध असल्यास तोंडाने काहीही देऊ नका.
- त्वरित डॉक्टर किंवा रुग्णवाहिका (108) शी संपर्क साधा.

### उष्माघात टाळण्यासाठी काय करावे?

- दिवसभर भरपूर पाणी प्या.
- लिंबूपाणी, ताक, नारळपाणी, ORS घ्या
- दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो बाहेर पडू नका
- हलक्या रंगाचे सैल सूती कपडे वापरा.
- डोक्यावर टोपी किंवा ओला रुमाल ठेवा.
- जड, तेलकट आणि तिखट पदार्थ टाळा.

**लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांनी विशेष काळजी घ्यावी.उष्माघाताची लक्षणे दिसल्यास दुर्लक्ष करू नका. वेळेवर योग्य उपचार केल्यास गंभीर धोका टाळता येतो.**

# चहा सोडल्यास खरोखर वजन घटते का?

## जाणून घ्या चहाचा त्याग आणि वेट लॉसचे नेमके कनेक्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील अनेकांची आनंदी आणि उत्साही सकाळ चहा प्यायल्यानंतर सुरू होते. त्यामुळे फार पूर्वीपासून चहा आणि भारतीयांचे एक अनोखे नाते निर्माण झाले आहे. परंतु, चहामुळे वजन वाढते असे अनेकदा म्हटले जाते.

त्यामुळे जेव्हा कधी वजन कमी करण्याचा विचार येतो, तेव्हा बरेच जण पारंपरिक दुधाचा चहा बंद करतात. पण, खरेच वजन कमी करताना चहा पिण्याची सवय बंद करणे गरजेचे असते का? याविषयी हेल्थ इन्फ्लुएंसर यांच्या मते गाय, म्हैस या जनावरांच्या १०० मिली दुधात सुमारे ५०-६० किलोकॅलरी असते, तर एक चमचा साखरेत (४.३ ग्रॅम) १६ किलोकॅलरी असते. याचा अर्थ एक कप चहामध्ये अंदाजे १००-११० किलोकॅलरी असते. यामुळे फॅट कसे कमी होणार?

तुम्ही चहामध्ये अनावश्यक पांढरी साखर तर टाकताच, शिवाय त्याबरोबर रस्क, बिस्किटे, खारी, पकोडे यांसारखे स्नॅक्स खाता.याचा अर्थ, तुमचा दैनंदिन कॅलरी भत्ता आणि तुमच्या आरोग्याच्या समस्यांच्या आधारे दिवसभरात दोन लहान कप चहा पिणे पूर्णपणे स्वीकार्य आहे, पण यात कॅफीनचे प्रमाण कमी असले पाहिजे.

तुम्ही चहाच्या कपमध्ये अनावश्यक साखर/गूळ घालणे टाळा. त्याऐवजी स्टीव्हिया किंवा मोंक फ्रूट सारखे ० किलोकॅलरी गोड पदार्थ घ्या.तुम्हाला चिंता, हाय कॉर्टिसोल, हाय ब्लड शुगर आणि हायपर ॲसिडिटीचा त्रास असल्यास एक कपपेक्षा जास्त चहा पिऊ नका.



अहमदाबादमधील मुख्य आहारतज्ज्ञ यांच्या मते, जर कोणी वजन कमी करण्याचा विचार करत असेल तर नेहमी चहाचे सेवन कमी करण्याची शिफारस केली जाते. कारण त्यात कॅलरीज असतात, टॅनिन असते जे लोह आणि काही खनिजांच्या शोषणात अडथळा निर्माण करतात.मुख्य जेवणासह चहा पिणे टाळले पाहिजे. जेवण्यापूर्वी आणि जेवणानंतर एक ते दोन तासांचे अंतर राखल्यानंतरच चहा घ्या. जर एका दिवसात तुम्ही दुधाच्या चहाचे सेवन जास्त प्रमाणात करत असाल तर काही कप ग्रीन टी किंवा ब्लॅक टी प्यायली पाहिजे.साखरेचे सेवन मर्यादित करण्याचा सल्ला दिला आहे. गुळ किंवा साखरेमध्ये जवळजवळ समान कॅलरीज असतात, म्हणून त्यांचे सेवन मर्यादित करण्याची शिफारस केली जाते. याऐवजी तुम्ही ब्राऊन शुगर निवडू शकता. साखरेचे प्रमाणात सेवन केल्यास तुम्हाला लालसेवर नियंत्रण ठेवता येते आणि रक्तातील साखरेची पातळीदेखील मर्यादित ठेवता येते, ज्यामुळे अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत होते.

याशिवाय संपूर्ण दूध किंवा मलई घालून बनवलेल्या चहामध्ये सॅच्युरेटेड फॅट्स जास्त असू शकतात. त्यामुळे चहाचे सेवन बंद करत तुम्ही तुमच्या आहारातून हे उच्च चरबीयुक्त घटक काढून टाकू शकता, यामुळे वजन कमी करण्यास आणि संपूर्ण हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते.अतिरिक्त कॅलरी न जोडता हायड्रेट राहण्यासाठी चहाच्या जागी तुम्ही पाणी किंवा इतर कमी कॅलरी असलेली पेये निवडू शकता.

# उपाशीपोटी लसूण खाण्याचे ५ जबरदस्त फायदे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**नैसर्गिक शक्ती :** लसणाला 'नॅचरल अँटीबायोटिक' मानले जाते, जे शरीराला अनेक आजारांपासून वाचवते.

**हृदयाचे आरोग्य :** रोज सकाळी उपाशीपोटी लसूण खालल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते आणि हृदय निरोगी राहते.

**रक्तदाब नियंत्रण :** ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांच्यासाठी लसूण एक उत्तम नैसर्गिक औषध ठरते.

**रोगप्रतिकारशक्ती :** लसणामध्ये असलेल्या औषधी गुणांमुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती (Immunity) वेगाने वाढते.

**पचन सुधारते :** उपाशीपोटी लसूण खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि पोटाच्या तक्रारी दूर होतात.

**डिटॉक्सिफिकेशन:** शरीरातील विषारी पदार्थ (Toxins) बाहेर काढण्यासाठी लसूण अत्यंत प्रभावी आहे.

**संसर्गापासून बचाव :** सर्दी, खोकला आणि व्हायरल इन्फेक्शनपासून वाचण्यासाठी रोज एक लसणाची पाकळी खाणे फायदेशीर आहे.

सावधानता,लक्षात ठेवा, लसणाचा प्रभाव उष्ण असतो, त्यामुळे उन्हाळ्यात याचे सेवन मर्यादित प्रमाणात करावे.









# ७४ फुटी गदा अन् १६२ फुटांची मूर्ती

## नागपुरात हनुमंतजींचे विराट रूप; अमित शहा करणार लोकार्पण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यातील नागपूर शहरात आता भव्य हनुमानजींची मूर्ती उभारली जात आहे. कोराडीत मध्य भारतातील सर्वांत उंच १६२ फुटांची हनुमानजींची मूर्ती आणि जगातील सर्वांत मोठी ७४ फुटी गदा असणारी ही मूर्ती साकारली जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या भव्य प्रकल्पाचे लोकार्पण होणार आहे.

**मूर्ती अंतिम टप्प्यात**

नागपूरच्या कोराडी परिसरात मध्य भारतातील सर्वांत भव्य आणि उंच भगवान हनुमानजींची मूर्ती अंतिम टप्प्यात साकारत असून, या भव्य प्रकल्पाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा मंदिराशेजारी उभारण्यात येणाऱ्या या मूर्तीची एकूण उंची तब्बल २०६ फूट असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही मूर्ती उभारण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते या मूर्तीचे लोकार्पण करण्यात येणार असल्याची





माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**७४ फूट उंचीची गदा**

या भव्य हनुमानजींच्या मूर्तीमध्ये फाऊंडेशनपासून एकूण उंची २०६ फूट ठेवण्यात आली असून, प्रत्यक्ष मूर्तीची उंची १६२ फूट आहे. विशेष म्हणजे भगवान हनुमानजींच्या हातातील गदा तब्बल ७४ फूट उंचीची असून, जगातील सर्वांत मोठ्या गदांपैकी एक मानली जात आहे. या गदेची नोंद 'गीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे मूर्तिकारांनी सांगितले.

**धार्मिक आणि तांत्रिक अनुभवाचा अनोखा संगम**

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर. मूर्तीवर विशेष धातूचा लेप देण्यात आला असून त्यामुळे ती अधिक आकर्षक आणि टिकाऊ बनली आहे. रात्रीच्या वेळी विशेष लाईटिंग आणि प्रोजेक्शन मॅपिंगच्या माध्यमातून ही मूर्ती विविध रूपांमध्ये पाहायला मिळणार आहे. प्रोजेक्शनच्या सहाय्याने हनुमान चालीसाचे सादरीकरण देखील करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांना धार्मिक आणि तांत्रिक अनुभवाचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.

**मध्य भारतातील सर्वात उंच हनुमान मूर्ती**

या प्रकल्पाचे मूर्तिकार नरेश कुमावत म्हणतात, की ही मूर्ती मध्य भारतातील सर्वांत उंच आणि भव्य हनुमानजींची मूर्ती ठरणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ही मूर्ती उभारण्यात आली असून, तिची गदा जगातील सर्वांत मोठ्या गदांपैकी एक आहे. तसेच या मूर्तीला धातूचे लेप लावण्यात आले आहे.

**धार्मिक पर्यटनाचे नवे केंद्र**

मूर्तीच्या परिसरात कृत्रिम तलावाचीही निर्मिती करण्यात आली आहे. तसेच मूर्तीच्या पायथ्याशी भगवान हनुमानजींच्या जीवनातील विविध प्रसंग आणि कार्याचे दर्शन घडविणारी विशेष मांडणी केली जाणार आहे. रामायणातील महत्त्वाचे प्रसंग, भक्ती, शक्ती आणि सेवाभावाचे संदेश आधुनिक पद्धतीने सादर करण्यात येणार असल्याने हा परिसर धार्मिक पर्यटनाचे नवे केंद्र ठरणार आहे.

**पालकमंत्री बावनकुळे काय म्हणाले?**

दरम्यान, नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार जून महिन्यापर्यंत या संपूर्ण प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यानंतर भव्य लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. या प्रकल्पामुळे कोराडी परिसराला धार्मिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने नवी ओळख मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

**लोकार्पण सोहळ्याकडे लक्ष**

भगवान हनुमंतजींच्या या भव्य मूर्तीच्या लोकार्पण सोहळ्याकडे आता भाविकांसह नागपूरकरांचे लक्ष लागले आहे.

## मंगळाची उत्पत्ती आणि शिव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू पौराणिक कथांनुसार, 'मंगळ' (ग्रह) चा जन्म भगवान शिवाच्या घामाच्या थेंबापासून झाला आहे.

पौराणिक कथा: शिवपुराण आणि स्कंद पुराणामध्ये सांगितल्यानुसार, महादेव अंधकासुर नावाच्या दैत्याशी युद्ध करत होते. त्यावेळी त्यांच्या कपाळावरून घामाचे काही थेंब पृथ्वीवर पडले. या घामाच्या थेंबांपासून एक तेजस्वी चार भुजा असलेला बालक जन्माला आला, ज्याला आपण 'मंगल ग्रह' किंवा 'मंगळ देव' म्हणून ओळखतो.

लाल रंग: या बालकाची उत्पत्ती अग्नी आणि पृथ्वीशी संबंधित असल्यामुळे त्याचा रंग लाल मानला जातो. उज्जैन येथील 'मंगलनाथ' मंदिरात मंगळाचा जन्म झाला, अशी मान्यता आहे.

जर एखाद्याच्या कुंडलीत 'मंगल दोष' असेल तर भगवान शिवाची पूजा करणे अतिशय फलदायी मानले जाते. मंगळवारी महादेवाला बेलपत्र, लाल फुले आणि तांदूळ अर्पण केल्याने मंगळाचा प्रकोप शांत होतो.

# अधिकमासात करावयाची व्रते व त्यासंबंधीचे नियम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



१) या महिन्यात पहाटे लवकर उठून थंड पाण्याने स्नान करावे. अंगाला सुगंधी उटी लावावी. नदीवर अथवा तीर्थाच्या ठिकाणी स्नानादी धार्मिक कृत्ये करावीत. मन निर्मळ ठेवावे. या महिन्यात आवळीच्या झाडाखालील स्नानाला विशेष महत्त्व आहे.

**स्नानानंतर म्हणावयाचा मंत्र**

गोवर्धनधरं वंदे गोपालं
गोपरूपिणम् ।
गोकुलोत्सवमीशानं गोविंदं
गोपिकाप्रियम् ॥
भक्तिर्भवति गोविंदे
पुत्रपौत्रविवर्धिनी ।
अकीर्तिक्षयमाप्नोति सत्कीर्तिर्वधते
चिरम् ॥

२) या मासात शक्यतो एक वेळेसच अन्नग्रहण करावे. जेवताना मौन पाळावे.

३) अधिक महिन्यात रोज देवाजवळ दिवा लावावा आणि महिन्याच्या शेवटी तो ब्राह्मणाला दान द्यावा.

४) या महिन्यात आपल्याला आवडणार्या वस्तूचा त्याग करावा. ( उदा. एखादे फळ अथवा एखाद्य रंगाचे वस्त्र वगैरे. )

५) या महिन्यातील दानाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

हिंदू धर्मात मुलगी – जावयाला लक्ष्मीनारायणाचा जोडा मानतात. म्हणून जावयाला तुपात तळलेले तेहतीसच्या पटीत अनारसे देतात. एका चांदीच्या अथवा तांब्याच्या ताम्हणात अनारसे ठेवून त्यावर तांब्याचा दिवा ठेवून तो लावून जावयाला देतात. (अनारशा ऐवजी बत्तासे, म्हैसूरपाक, वगैरे जाळीदार पदार्थ द्यावयाचे असतात.) या महिन्यात नारळ, सुपार्या, फळे यासारख्या वस्तू सुद्धा तेहतीसच्या पटीत घेऊन दान करतात.


या महिन्यात पुरणाचे दिंड करून इष्ट मित्रांना, नातेवाईकांना भोजन देतात (या दिंडांना धोंडे सुद्धा म्हणतात यावरुन या महिन्यास 'धोंडे महिना सुद्धा म्हणतात.)

– रोज गाईला पूरण पोळीचा घास द्यावा. – महिनाभर सतत नामस्मरण करावे – यात कुलदैवताचे नामस्मरण सर्वश्रेष्ठ. – नारायण – श्रीकृष्णाचे स्मरण करावे.

## अधिक महिन्यातील कर्मे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) अधिक महिन्यात नित्य, नैमित्तिक कर्मे करावीत.
२) श्राद्ध करावे.
३) तिथी, नक्षत्र, वार यांच्यावर सांगितलेले काम्य कर्म कदापि करू नये.
४) कोणत्याही काम्य कर्माचा आरंभ किंवा समाप्ती मलमासांत करू नये.
५) सूर्यसंक्रांतिरहित जो अधिक मास त्यात व्रते, यज्ञ यांचा आरंभ अथवा समाप्ती करू नये.
६) कारीरी म्हणजे वृष्टिनिमित्तक करावयाचा याग, पर्जन्ययाग करू शकता.
७) राक्षोध्न होम करू शकता.
८) अभिचार, प्रत्यभिचार, असे तंत्र करता येतात.
९) रोगनाशक विधी करता येतात.
१०) ग्रह स्वास्थ्यविषयक निमित्तक जी काम्य कर्मे त्यांचा आरंभ व समाप्तीही करावीच.
११) अनन्यगतिक ( जे केल्यावाचून गती नाही ते ) कर्म, नित्य कर्मे व नैमित्तिक कर्मे ही मलमासांत करावी.
१२) अग्नी नष्ट झाला असता अग्न्याधान करता येते.
१३) देवाला अशौच स्पर्श, चांडालादिकांचा स्पर्श झाला असता पुनःप्रतिष्ठादिक कर्मे करावीत.
१४) ज्या कर्माला दुसरा काल आहे अशी सोमयाग इत्यादीक कर्मे तर करूच नये.



# अधिक मासातील ३३ दाने

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अधिक मास (पुरुषोत्तम मास) हा दान, जप, तप आणि पुण्यकर्मासाठी अत्यंत शुभ मानला जातो. या महिन्यात '३३ दान' देण्याची परंपरा आहे. ही दाने केल्याने विशेष पुण्य मिळते, असे शास्त्रात सांगितले आहे.**




**१) अन्नदान**
**२) जलदान**
**३) वस्त्रदान**
**४) तांदूळ (अक्षत) दान**
**५) गहू दान**
**६) तूप दान**
**७) साखर दान**
**८) गूळ दान**
**९) मीठ दान**
**१०) तेल दान**
**११) दूध दान**
**१२) दही दान**
**१३) मध दान**
**१४) फळे दान**
**१५) भाज्या दान**
**१६) सोने दान (शक्य असल्यास)**
**१७) चांदी दान**
**१८) तांबे दान**
**१९) लोखंड दान**
**२०) जमीन दान (शक्य असल्यास)**
**२१) गोदान (गाय दान शक्य असल्यास)**
**२२) छत्री (छाया) दान**
**२३) चप्पल/पादत्राणे दान**
**२४) आसन दान**
**२५) पुस्तक/ग्रंथ दान**
**२६) दीपदान (दिवा)**
**२७) धूप/अगरबत्ती दान**
**२८) शय्यादान (बिछाना/गादी)**
**२९) कंबळ/चादर दान**
**३०) औषध दान**
**३१) विद्या दान (शिक्षणासाठी मदत)**
**३२) सुवासिक वस्तू (चंदन/इत्र) दान**
**३३) दक्षिणा दान (ब्राह्मण/गरजूंना)**

# 'ॐ गं गणपतये नमः' या बीजमंत्राचे महत्त्व काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'ॐ गं गणपतये नमः' हा भगवान श्रीगणेश यांना प्रसन्नतेसाठी आणि कृपादृष्टीसाठीचा अत्यंत प्रभावशाली बीजमंत्र आहे. याचा मुख्य अर्थ विघ्नहर्ता भगवान श्रीगणेशांना माझा नमस्कार असो', असा आहे. हा मंत्र बुद्धी, यश आणि अडथळे दूर करण्यासाठी अतिशय शक्तिशाली मानला जातो.

## मंत्राचा सविस्तर अर्थ

- **'ॐ : हे विश्वाचे मूळ आणि दैवी शक्तीचे प्रतीक आहे.**
- **गं : हे गणपती बाप्पांचे बीजाक्षर (बीजमंत्र) आहे. जे ऊर्जा जागृत करते.**
- **गणपतये : ज्यांचा अर्थ 'गणांचे स्वामी' असा आहे.**
- **नमः : म्हणजेच नमन किंवा नमस्कार.**

## मंत्राचे महत्त्व आणि फायदे

**अडथळे दूर होतात :** कोणत्याही नवीन कार्याची, व्यवसायाची किंवा प्रवासाची सुरूवात करण्यापूर्वी या मंत्राचा जप केल्यास कार्यातील सर्व अडचणी व विघ्ने दूर होतात.

**बुद्धी व स्मरणशक्ती वाढते :** हा मंत्र विद्यार्थ्यांसाठी आणि ज्ञान मिळवू इच्छिणाऱ्यांसाठी विशेष लाभदायक आहे.

**सकारात्मक ऊर्जा व शांतता :** या मंत्राच्या नियमित जपाने (विशेषतः ११, २१ किंवा १०८ वेळा) मानसिक शांतता मिळते आणि भीती नाहीशी होते.

हा मंत्र अतिशय सोपा व प्रभावी असल्याने रोज सकाळी किंवा नवीन काम सुरू करताना श्रद्धापूर्वक याचा जप करणे खूप शुभ मानले जाते.



# पृथ्वी आणि मंगळग्रहामध्ये खास नाते!


## शास्त्रज्ञांच्या संशोधनाने जगभरात खळबळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पृथ्वी आणि मंगळग्रह दिसायला वेगळे असले, तरी त्यांच्या निर्मितीमध्ये कमालीचे साम्य असल्याचे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे. स्वित्झर्लंडमधील 'ETH झुरिच' विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या उल्कापिंडांच्या अभ्यासानुसार पृथ्वीची मूळ रचना ही मंगळग्रहाशी मिळतीजुळती आहे. या शोधामुळे ग्रहांच्या उत्पत्तीबाबत अनेक नवीन रहस्ये उलगडली आहेत.

विश्वनिर्मितीच्या कोड्यात आता एक नवीन दुवा जोडला गेला आहे. शास्त्रज्ञांनी मंगळग्रहावरून आलेल्या दुर्मिळ उल्कापिंडांची तपासणी केली असता त्यातील घटक आणि पृथ्वीवरील काही प्राचीन खडकांची रचना सारखीच असल्याचे आढळले. या दोन्ही ग्रहांचा 'जन्मदाता' कदाचित एकच असावा किंवा त्यांच्या निर्मितीची प्रक्रिया समांतर असावी, असा अंदाज या अभ्यासामधून व्यक्त करण्यात आला आहे.

ब्रह्मांडात अशी अनेक रहस्ये आहेत, ज्यांच्याबद्दल अनेकदा वेगवेगळी माहिती समोर येते. अलीकडेच शास्त्रज्ञांनी एक असा शोध लावला आहे ज्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. नवीन अभ्यास आपल्याला पृथ्वीची निर्मिती करणारी सामग्री मूळतः कोठून आली हे समजून घेण्याच्या अगदी जवळ आणते, ज्यामुळे ग्रहाच्या उत्पत्तीबद्दलच्या पूर्वीच्या सिद्धांतांना आव्हान दिले जाते.



शास्त्रज्ञांनी नेहमीच पृथ्वीची निर्मिती कशी झाली या शोधावर काम केले आहे. बुध, शुक्र आणि मंगळासह पृथ्वीची निर्मिती सूर्यमालेत झाली आहे, असे शास्त्रज्ञांनी पूर्वी मानले होते. त्याचवेळी त्याच्या पदार्थाचा एक मोठा भाग गुरूच्या कक्षेच्या पलीकडे बाह्य सूर्यमालेतून आला असेल. तथापि, नवीन संशोधनात असे काही दावे केले गेले आहेत ज्यामुळे सर्वकाही वेगळे झाले आहे. नवीन संशोधनात असे आढळले आहे की पृथ्वीची निर्मिती जवळजवळ पूर्णपणे आतील सौर मंडळात सापडलेल्या सामग्रीपासून झाली आहे.

**संपूर्ण संशोधनाबद्दल काय माहिती?**

स्वित्झर्लंडमधील युनिव्हर्सिटी 'झुरिच'च्या शास्त्रज्ञांनी उल्कापिंडांची तपासणी केली आणि मंगळ आणि वेस्टा (लघुग्रह पट्ट्याचा एक मोठा तुकडा) च्या उल्कापिंडांची पृथ्वीशी तुलना केली.

बीबीसीच्या एका रिपोर्टमध्ये म्हटले आहे, की शास्त्रज्ञांना असे आढळले आहे की पृथ्वी जवळजवळ पूर्णपणे आतील सौर मॉडेल सामग्रीने बनलेली आहे. बाह्य सूर्यमालेतील सामग्री पृथ्वीच्या एकूण वजनाच्या २ टक्क्यांपेक्षा कमी आहे. या संशोधनाबाबत शास्त्रज्ञ पाओली सोसी यांनी सांगितले, की पृथ्वी एकाच प्रकारच्या पदार्थाच्या साठ्यातून तयार झाली आहे. त्याचवेळी पाओली सोसीचा भागीदार डॅन बॉव्हर हे पाहून आश्चर्यचकित झाले की पृथ्वी पूर्णपणे आतील सामग्रीने बनलेली आहे. अभ्यासानुसार, पृथ्वी पूर्णपणे नॉन-कार्बनयुक्त पदार्थांनी बनलेली आहे आणि ती आतील आणि बाह्य सौर यंत्रणेतील पदार्थांच्या संयोगाने बनलेली असल्याचा कोणताही पुरावा नाही.

**शास्त्रज्ञांचा काय दावा?**

शास्त्रज्ञांचा असा दावा आहे, की गुरूने त्याच्या मजबूत गुरुत्वाकर्षणामुळे सौर यंत्रणेला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. असे मानले जाते की गुरूने मंगळाच्या आकारावर प्रभाव पाडला, लघुग्रह पट्ट्याच्या निर्मितीस मदत केली आणि तरुण सौर यंत्रणेला दोन वेगळ्या पदार्थांच्या साठ्यांमध्ये विभागले.

**पृथ्वी आणि मंगळ यांची रचना एकच?**

शास्त्रज्ञांनी सांगितले, की नवीन अभ्यासाच्या विश्लेषणावरून असे दिसून आले आहे की शुक्र आणि बुध यांच्या रचनेचा अंदाजही लावला जाऊ शकतो. मिळालेल्या रिपोर्टनुसार, या रिपोर्टमध्ये पृथ्वी आणि इतर खडकाळ ग्रहांच्या निर्मितीचा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की पृथ्वीची रचना मंगळग्रहाशी मिळतीजुळती आहे.